दै. प्रजावाणी (९) ३१/७

# दिशा बदलली, नैसर्गिक सीमा ओलांडली अन् प्रगणक गटाचे तुकडे..

- प्रभाग रचनेवरील आक्षेपांची महापालिकेत झाली सुनावणी
- सनदी अधिकारी संतोष कुमार यांनी जाणून घेतली मते



## पाच ऑगस्टपर्यंत अहवाल आयोगाकडे

मनपा प्रशासनाने आक्षेप घेणाऱ्यांचे मुद्दे लक्षात घेऊन वेगवेगळे १४ गट तयार केले होते. या गटातील प्रत्येक व्यक्तीला बोलावून एकेक करीत म्हणणे जाणून घेतले. नागरिकांच्या आक्षेपाबाबत त्याच ठिकाणी मनपा आयुक्तांशी चर्चा करून खुलासा जाणून घेतला. येत्या पाच ऑगस्ट २०१७ पर्यंत आज झालेल्या सुनावणीबाबत संतोषकुमार हे राज्य निवडणूक आयोगाकडे आपला अहवाल सादर करणार आहेत. त्यानंतर १० ऑगस्ट रोजी राज्य निवडणूक आयोग त्यावर आपला निर्णय देणार असून, १४ ऑगस्ट रोजी अंतिम प्रभागरचना व आरक्षण सोडतीची अधिसूचना प्रसिद्ध केली जाणार आहे.

नांदेड,दि.२८: प्रभाग तयार करताना कुठे दिशा चुकली...तर कुठे नैसर्गिक सीमा ओलांडली. कुठे एका रस्त्याचा अर्धा भाग अन्य प्रभागात वळविला तर कुठे प्रगणक गटाचे तुकडे केले....प्रभागरचना कशी चुकली, याचा युक्तिवाद करणाऱ्यांची शुक्रवारी (दि.२८) महापालिकेत मोठी जत्रा भरली होती. राज्य निवडणूक आयोगाचे प्राधिकृत अधिकारी तसेच महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सदस्य सचिव संतोष कुमार यांनी स्थायी समितीच्या सभागृहात एकेक करीत आक्षेप दाखल केलेल्या सर्व नागरिकांची मते 'इन कॅमेरा' जाणून घेतली. नोंदवून घेतली. आता राज्य निवडणूक आयोगाकडून यावर दिल्या जाणाऱ्या निर्णयाची सर्वांना प्रतीक्षा आहे.

महानगरपालिकेची प्रभागरचना गैरसोयीची जाणवणाऱ्या राजकीय पुढारी व इच्छुकांकडून मागच्या आठवड्यात आक्षेपांचा पाऊस पडला होता. नागरिकांनी अभ्यासपूर्ण विवेचन करून तसेच प्रभागरचनेतील असुविधेकडे लक्ष वेधून आपापले आक्षेप दाखल केले होते. यात प्रभागाचे नाव बदलण्यापासून प्रभागातील अनुसूचित जाती लोकसंख्येपर्यंतच्या अनेक आक्षेपांचा समावेश होता. मागच्या वेळी उच्च न्यायालयात प्रकरणे दाखल करुन महापालिका प्रशासन व निवडणूक आयोगाला कामाला लावणाऱ्या जफर अली खान यांनी या वेळीही आपले आक्षेप दाखल केले. स्थानिक यंत्रणेने यंदा त्यांच्या प्रत्येक आक्षेपांवर स्वतंत्र सुनावणी घेण्याची काळजी घेतल्याचे दिसून आले.

महानगरपालिकेच्या प्रभाग रचना व आरक्षणासाठी सर्वप्रथम २३ जून ही तारीख जाहीर झाली होती. परंतु, निवडणूक आयोगाने तो कार्यक्रम लांबविल्यानंतर ६ जुलैला सोडत काढण्यात आली. या सोडतीत ओबीसी महिलांचे आरक्षण चुकल्यामुळे या जागांसाठी १० जुलैला फेरसोडत काढण्यात आली. फेरसोडतीत झालेल्या सुधारित आरक्षणाच्या आधारे महानगरपालिका प्रशासनाकडे ८२ आक्षेप दाखल झाले होते. त्यावर शुक्रवारी (दि.२८) सकाळी १०.३० ते दुपारी ४ या वेळेत सनदी अधिकारी संतोषकुमार यांनी महापालिकेच्या स्थायी समिती सभागृहात सुनावणी घेतली. आक्षेप घेणाऱ्या ८२ पैकी ६९ जण या वेळी हजर होते.

काँग्रेस-शिवसेनेच्या अनेक आजी-माजी नगरसेवकांनी आक्षेप घेताना अत्यंत प्रभावी मुद्दे मांडले. संतोषकुमार यांनी उत्सुकतेने सर्व मुद्द्यांबाबत आयुक्त गणेश देशमुख यांच्यासह निवडणूक विभागातील अधिकाऱ्यांना विचारणा करून चर्चा केली आणि आक्षेपांवरील ■ पान २ वर

### दिशा बदलली, नैसर्गिक सीमा ...

अभिप्रायाची स्वत:कडील नोंदवहीत स्वतंत्रपणे नोंद करून घेतली.

**आक्षेपांचे काय होणार?**

प्रभागरचना व आरक्षणावरील आक्षेप घेणाऱ्यांचे आजवरचे अनुभव लक्षात घेतले तर आक्षेपांची आयोगाकडून फारशी दखल घेतली जात नाही. आयोगाचे अधिकारी येऊन सुनावणीची प्रक्रिया पूर्ण करतात आणि त्यांच्या अहवालावर अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार राज्य निवडणूक आयोगाला असल्यामुळे पूर्वीच्या परिस्थितीत अगदी अपवादात्मक किरकोळ बदल होतो. मागच्या वेळी नवी आबादी प्रभागाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरनगर हे जोडनाव देण्याची मागणी मान्य झाली होती. या वेळी दाखल झालेल्या आक्षेपांचे काय होणार, याची आक्षेपकर्त्यांसह यातून फायदा-तोटा होणाऱ्या सर्वांचे लक्ष लागून आहे.